एक अपत्य असलेल्या पालकांच्या सामाजिक व आर्थिक स्थितीचे समाजशास्त्रीय अध्ययन (विशेष संदर्भ हिंगोली जिल्हा)

स्वामी रामानंद तीर्थ
मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मानव विज्ञान विद्याशाखे अंतर्गत **समाजशास्त्र** विषयातील

विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवीसाठी

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

या विद्यापीठास सादर करावयाचा शोध प्रबंधाचा

प्रस्तावित आराखडा

***संशोधक ***

पवार प्रियंका शिवाजीराव

*** मार्गदर्शक ***

प्रा. डॉ. भिसे रामचंद्र मुंजाजी

(एम.ए., एम. फिल., पीएच.डी., नेट)

समाजशास्त्र विभाग प्रमुख,

दिगंबरराव बिंदू कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,

भोकर जि. नांदेड

जानेवारी - 2024

प्रस्तावना -

मानवी समाजातील मूलभूत सामाजिक संघटन म्हणून कुटुंबाचा उल्लेख येतो. कुटुंब मानवी समाजातील अतिशय महत्त्वाचा असा समूह घटक आहे. समाजातील सर्व सामाजिक संस्थाच्या अभ्यासात अत्यंत महत्वपुर्ण आणि मुलगामी मानली गेलेली संस्था म्हणजे कुटुंबसंस्था होय. इतर कोणत्याही समूहापेक्षा कुटुंब हा समुह सर्व व्यापक आहे. मानवी समाजाच्या विकासाच्या टप्प्यातील कुटुंब ही पहिली अवस्था आहे. भटकंती करणारे मनुष्य आता मात्र आधुनिक जीवन जगत आहेत. मानवी समाजाचा इतिहास म्हणजेच कुटुंबाचा इतिहास. कोणत्याही प्रकारचा समाज असो त्यामध्ये कुटुंबाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. कुटुंब या शब्दासाठी इंग्रजीमध्ये Family हा शब्द वापरला जातो. जो Famulus या मुळ लॅटीन शब्दापासुन बनला आहे. Famulus हा शब्द मानवी समुहाचा निर्देशक आहे. कुटुंब म्हणजे असा मानवी समुह ज्यामध्ये पती, पत्नी त्यांची मुले तसेच गुलाम किंवा नौकर यांचाही समावेश आहे. कुटुंबाचा आकार, संख्या, विवाह ,निवास, अधिकार आणि कर्तव्य यावरून आपल्याला कुटुंबाचे स्वरूप भिन्न असल्याचे दिसून येते. भिन्नभिन्न स्वरूपाचे कुटुंब जरी असले तरी ही समाजिक संस्था आपल्याला जगभर आढळते मग ते अमेरिकेतील, रशियातील उच्च भूषित समाज असो किंवा अंदमान निकोबार येथील आदिवासी समाज असो कुटुंब संस्था हा समाजाचा महत्त्वाचा घटक आहे.

मानवी जीवनामध्ये कुटुंब संस्थेचे महत्त्व खूप आहे. कुटुंब हा एक समूह असून परिपूर्ण आणि रक्तसंबंधीत नाते व दत्तकपुत्र यांच्या संबंधावर आधारित आहे. किंबॉल यंग यांच्या व्याख्यानुसार "कुटुंब हा असा समुह आहे ज्या समुहात एक किंवा अधिक पुरुष आणि एक किंवा अधिक स्त्रीया आपल्या अगर दत्तक घेतलेल्या मुलासह, निदान मुले मोठी होईपर्यंत एकाच घरात राहतात, सामाजिक समुहाला कुटुंब असे म्हणतात". कोणत्याही संस्कृतीत कुटुंबाचे पुनरुत्पादन, मुलांचे संगोपन, मुलांचे पालन पोषण करणे, संरक्षण करणे, सर्वांची काळजी घेणे, सुखदुःखात सहभागी होणे ही कुटुंबाची महत्वपुर्ण कार्य आहेत. कुटुंबामध्ये मुलांच्या गरजेची पूर्तता होते, त्यांना शिक्षण दिले जाते, त्यांची भविष्य घडवली जातात. प्रत्येक कुटुंबामध्ये जशा जबाबदाऱ्या, कर्तव्य असतात त्याचप्रमाणे हक्क सुद्धा असतात.

विज्ञान व तंत्रज्ञानाच्या विकासामुळे आणि जगभरातील राष्ट्रामध्ये झालेल्या औद्योगिक क्रांतीचे परिणाम समाजावरील सर्व घटकांवरती पडलेले दिसून येतात त्यातून कुटुंब व्यवस्था ही कशी विभक्त राहणार. कुटुंब संस्थेवर सुद्धा आधुनिक युगाचा परिणाम झालेला आहे. पूर्वी असलेली संयुक्त कुटुंब आता मात्र विभक्त कुटुंब झालेली आहेत. या विभक्त कुटुंबामध्ये सुद्धा आता भर म्हणून गेल्या वीस वर्षापासून एकच अपत्य असलेली कुटुंबे यांच्यात वाढ झालेली दिसून येते.

जुन्या संकल्पना वंशाचा दिवा, "भावंडांनी भरलेले घर म्हणजे गोकुळ", "बहिण भाऊ यांच्याशिवाय संकटकाळी कोण मदतीला येतं", "जेवढी माणसे जास्त घरात तेवढं अर्थार्जण जास्त, "ह्या सारख्या अनेक पूर्वपारंपारिक कल्पना मोडून आता, "हम दो हमारा एक", "छोटे कुटुंब सुखी कुटुंब" “एकच मुल सुंदर फुल", ही संकल्पना लोकांमध्ये रुजू होताना दिसते. एकच अपत्य कुटुंब म्हणजे अशी कुटुंब ज्यामध्ये एकुलता एक मुलगा किंवा मुलगी ज्याला जन्माने किंवा दत्तक घेतल्याने बहिण भाऊ नसतात. वैयक्तिक परिस्थितीमुळे जसे की जोडीदाराचा मृत्यू, वंधत्व, घटस्फोट किंवा काडी मोड किंवा सामाजिक आर्थिक परिस्थितीमुळे कधी कधी स्व इच्छेने सुद्धा पालक एकच अपत्य किंवा बालकाची निवड करतात.

बऱ्याच लोकांसाठी करिअर करणे प्राधान्याचे किंवा गरजेचे असते. जरी मुले असणे हे समाजाच्या दृष्टीने अत्यावश्यक असले तरी, काही जोडप्यांना अनेक मुलांचे संगोपण करणे कठीण वाटते. अश्या प्रकारे करिअर ला महत्व देणारे एकच मुल हवे अट्टाहास धरतात. कुटुंबामध्ये एकच मुल असणे याची अनेक कारणे आहेत. प्रजनन समस्या हे लक्षणीय कारण आहे. आधुनिक जीवनशैली, कामाचा ताणतणाव यामुळे प्रजनन क्षमतेवर परिणाम होतो. अनेक जोडप्यांना दुसरे मुल होण्यासाठी महागडे उपचार करावे लागतात जेकी त्यांच्या खिशाला परवडणारे नसतात. त्यामुळे इच्छा असुणसुध्दा अनेक जोडपे एकच मुल यावर समाधानी असतात. घटस्फोट किंवा काडीमोड हे सुध्दा एकच मुल असण्याचे कारण आहे. जोडीदाराशिवाय मुलांचे

संगोपन करणे कठीण जाते. आर्थिक बाजुही सांभाळावी लागते. जेकी एका व्यक्तीने शक्य नाही. त्यामुळे अशा कुटुंबात सुध्दा एकच मुल असते. वैयक्तिक परिस्थितीमुळे कधी कधी पालक एकापेक्षा जास्त मुलांचे संगोपन, पालन पोषण करण्यास असमर्थ असतो. त्यामुळे नाईलाजाने ते एकाच मुलाचे पालकत्व स्वीकारतात.

काही दशकांपूर्वी एकच अपत्य असणे दुखी व असमाधानी वाटत होते. तिथेच आज मात्र परिस्थिती विपरीत झालेली दिसून येते. लोकसंख्येच्या बाबतीत भारत दुसऱ्या क्रमांकावर आहे. 125 कोटी लोकसंख्या असलेल्या या देशांमध्ये जन्मदर मात्र कमी झालेला दिसून येतो. लोकसंख्येचा स्फोट होत आहे. गेल्या 30 दशकापासून लोकांमध्ये कुटुंब नियोजनाची जनजागृती करण्यात आली. सध्याच्या स्थितीला दोन किंवा दोन पेक्षा जास्त आपत्यांना वाढवणे त्यांची संगोपन करणे सोपे नाही. म्हणूनच त्याचा परिणाम म्हणून भारतातील एका आपत्या असलेल्या कुटुंबांची संख्या साधारण पाच टक्के त्यातही 13% कुटुंब ही शहरी भागात आढळून येतात याचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत चाललेले आहेत. दोन किंवा दोन पेक्षा जास्त अपत्य यांचे भविष्य सुखकर करणे पालकांना खर्चिक वाटते त्यामुळेच का होईना एकच अपत्य असणे योग्य वाटत आहे. दोन किंवा दोन पेक्षा जास्त आपत्य पालकांच्या समस्या ह्या एकाच अपत्य असलेल्या पालकांच्या किंवा कुटुंबाच्या

समस्या पेक्षा वेगळे वाटत जरी असले तरी एकच अपत्य असलेल्या पालकांना त्यांच्या मुलाचे संगोपन करताना विविध अशा समस्यांना सामोरे जावे लागते.

एकच अपत्य असलेल्या पालकांना पाल्याच्या बाल अवस्थेपासून ते किशोर अवस्थेपर्यंत अनेक समस्या उद्भवतात. एकच अपत्य पालकांना सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक इत्यादी विविध समस्या उद्भवतात. ह्या सर्व समस्या देशव्यापी असून समाजातील प्रत्येक घटकावर याचा कमी जास्त प्रमाणात परिणाम आहे. संशोधनाच्या दृष्टीने प्रस्तुत विषयाची व्याप्ती मोठी आहे. त्याचप्रमाणे व्यापक क्षेत्रीय संशोधन वेळ, श्रम, पैसा खर्च करणारे असते. तसेच विविध पूर्ण भिन्नभिन्न घटकामुळे निश्चित निष्कर्ष काढणे कठीण जाते. यामुळे संशोधन क्षेत्र निश्चित करून प्रस्तुत संशोधनासाठी, एक अपत्य असलेल्या पालकांच्या सामाजिक व आर्थिक स्थितीचे समाजशास्त्रीय अध्ययन (विशेष संदर्भ हिंगोली जिल्हा).

संशोधन समस्येचे शीर्षक -

एक अपत्य असलेल्या पालकांच्या सामाजिक व आर्थिक स्थितीचे समाजशास्त्रीय अध्ययन (विशेष संदर्भ हिंगोली जिल्हा)

संशोधनाचे महत्त्व -

कोणत्याही सामाजिक संशोधनाचा उद्देश हा एखाद्या समस्या विषयी माहिती जाणून घेऊन आपल्या व इतरांच्या ज्ञान वृध्दी करणे हा असतो. प्रस्तुत

संशोधनासाठी निवडलेला विषय, एक अपत्य असलेल्या पालकांच्या सामाजिक व आर्थिक स्थितीचे समाजशास्त्रीय अध्ययन (विशेष संदर्भ हिंगोली जिल्हा) हा आहे. हिंगोली जिल्ह्यातील एकच अपत्य असलेल्या पालकांच्या बाबतीत गैरसमज आणि पूर्वग्रह असू शकतात. या संकल्पना विषयी सर्व घटकांचा अभ्यास प्रस्तुत संशोधनात केला जाणार आहे. एकच अपत्य असलेल्या पालकांचा समाजावरती आणि समाजाचा एकच आपत्त्यावरती होणारा परिणाम बघणे महत्त्वाचे आहे.

संशोधन समस्या -

हिंगोली जिल्हा नवनिर्मित जिल्हा आहे. पूर्वीच्या परभणी जिल्ह्याचे एक मे 1999 रोजी विभाजन होऊन हिंगोली जिल्हा अस्तित्वात आला. हिंगोली जिल्ह्यात पाच तालुके, 565 ग्रामपंचायती आहेत. हिंगोली जिल्ह्याची लोकसंख्या 2011 च्या जनगणनेनुसार 1,177345 आहे. हिंगोली जिल्हा हा महाराष्ट्रातील इतर जिल्ह्याच्या तुलनेत भौगोलिक क्षेत्रफळाच्या दृष्टीने लहान जिल्हा आहे. त्याचबरोबर सामाजिक आर्थिक शैक्षणिक दृष्ट्या मागासलेला जिल्हा म्हणून ओळखल्या जातो. आधुनिकतेचा परिणाम सर्व जगावरती दिसुन येत आहे. त्याचप्रमाणे हा परिमणाम हिंगोली जिल्ह्यावरती ही दिसुन येतो. एकच अपत्य असलेल्या पालकांच्या किंवा कुटुंबाच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक इत्यादी विविध समस्या काय आहेत. एकच अपत्यांचे सामाजीकरण करताना पालकांना कोणकोणत्या समस्या येतात. एकच अपत्य असलेल्या पालकांची आर्थिक स्थिती, शैक्षणिक स्थिती समजून

घेताना येणाऱ्या समस्या जाणून घेऊन त्यावरती अभ्यासपूर्ण निष्कर्षाची मांडणी करण्यात येईल आणि मिळालेल्या निष्कर्षावरुन महत्वपूर्ण उपाय योजना मांडण्यात येणार येतील.

संशोधन उद्दिष्टे -

1) हिंगोली जिल्ह्यातील एक अपत्य असलेल्या पालकांची सामाजिक व आर्थिक स्थिती जाणून घेणे.

2) हिंगोली जिल्ह्यातील एक अपत्य असलेल्या पालकांची सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक समस्या जाणून घेणे.

3) हिंगोली जिल्ह्यातील एक अपत्य असलेल्या पालकांचे त्यांच्या पाल्यासोबत असलेले नातेसंबंध जाणून घेणे.

4) हिंगोली जिल्ह्यातील एक अपत्य असलेल्या कुटुंबाचा समाजावर होणारा परिणाम व कुटुंबाकडे बघण्याचा समाज दृष्टीकोन जाणून घेणे.

5) हिंगोली जिल्ह्यातील पालकांच्या एक अपत्याचे सामाजिकीकरणाचा आढावा घेणे.

6) हिंगोली जिल्ह्यातील पालकांचे एक अपत्य मुलगा व मुलगी यांच्या स्थितीचा तुलनात्मक आढावा घेणे.

गृहीतके -

1) एकच अपत्य असलेल्या पालकांच्या कौटुंबिक समस्यांना सामोरे जावे लागते.

2) एकच अपत्य पालकांना पाल्याकडून शैक्षणिक यशाबद्दल उच्च अपेक्षा असतात.

3) एकच अपत्याची संगोपन करताना पालकांना आर्थिक समस्यांचा सामना करावा लागणार नाही.

4) एकच अपत्य असलेल्या पालकांना व कुटुंबातील सदस्यांच्या नातेसंबंधात दुरावा दिसतो.

5) एकच अपत्य असलेल्या पालकांकडे समाजाचा दृष्टिकोन आदर्शवादी असतो.

6) एकच अपत्यांचे सामाजिकीकरण योग्य प्रकारे झालेले दिसुन येत नाही.

7) पालकांच्या एकच अपत्य असलेल्या मुलींचे सामाजिकीकरण मुलांपेक्षा योग्य झालेली दिसून येते.

संशोधनाची व्याप्ती -

1) प्रस्तुत अध्ययनाचे क्षेत्र हिंगोली जिल्हा या भौगोलिक क्षेत्रापुरते मर्यादित आहे.

2) प्रस्तुत अध्ययन हिंगोली जिल्ह्यातील पाच तालुके पुरते मर्यादित आहे.

3) अध्ययन विषयाच्या अध्ययनाचा केंद्रबिंदू एकच अपत्य असलेल्या कुटुंबाच्या समस्या आहे.

संशोधन पद्धती -

एक अपत्य असलेल्या पालकांच्या सामाजिक व आर्थिक स्थितीचे समाजशास्त्रीय अध्ययन (विशेष संदर्भ हिंगोली जिल्हा) प्रस्तुत संशोधन विषयाच्या अनुषंगाने करण्यासाठी या संमिश्र पद्धतीचा उपयोग करण्यात येणार आहे. या संशोधनात वर्णनात्म्क संशोधन आराखड्याचा (Descriptive Research Design) उपयोग करण्यात येणार आहे. या संशोधनात सर्वेक्षण पध्दतीमध्ये विशिष्ट सर्वेक्षण - एखाद्या विशिष्ट उद्देशाने प्रेरित होऊन जेव्हा सर्वेक्षण केले जाते. त्याला विशिष्ट सर्वेक्षण असे म्हणतात. सामाजिक संशोधनात संशाधन आराखडयाचा उपयोग महत्वपुर्ण साधन म्हणुन केला जातो. एखादया समुह व समुदायाच्या विशिष्ट अंगाची माहिती मिळविण्यासाठी या पध्दतीचा वापर केला जातो. या संशोधनात तुलनात्मक पद्धतीचा उपयोग करण्यात येणार आहे या संशोधन पध्दतीचा वापर करुन एकच अपत्य् असलेल्या पालकांच्या समस्या याचा अभ्यास करण्यात येईल. त्यामुळे प्रस्तुत संशोधनाचे कार्य पुर्ण करण्यासाठी वणर्नात्मक, विशिष्ट सर्वेक्षण आराखड्याचा उपयोग करण्यात येणार आहे.

सैद्धांतिक आधार -

समाजशास्त्रातील कुटुंबसंस्था हि मुलभूत सामाजिक संस्था या संकल्पनेचा आधार घेऊन हे संशोधन पूर्ण केले जाईल.

जनसंख्या -

सदर संशोधनासाठी हिंगोली जिल्ह्यातील 2011 च्या जनगणनेनुसार जनसंख्या 11,77,345 एवढी असून, त्यामध्ये एकच अपत्य असलेल्या कुटुंबांची संख्या ही संशोधनामध्ये जनसंख्या म्हणून वापरली जाईल.

नमुना निवड -

प्रस्तुत संशोधनासाठी नमुना म्हणून हिंगोली जिल्ह्यातील एकूण पाच तालुक्यातील प्रत्येकी 30 एकच अपत्य असलेली कुटुंबे याप्रमाणे अशी 150 कुटुंब ही ‘स्नो बॉल (snow ball)’ या नमुना निवड पद्धतीने निवड करून घेण्यात येतील.

तथ्य संकलन -

प्रस्तुत संशोधन अध्ययनासाठी पुढील प्रमुख स्त्रोतांचा वापर करून विश्वासनीय माहिती प्राप्त करण्याचा प्रयत्न केला जाईल.

1) प्राथमिक स्त्रोत

प्रस्तुत संशोधन अध्ययनासाठी उपयुक्त असलेले वास्तव माहिती मिळवण्यासाठी हिंगोली जिल्ह्यातील एकच अपत्य असलेल्या कुटुंबांना भेटी देऊन त्यांच्याकडून मुलाखत अनुसूची भरून घेतली जातील. मुलाखत अनुसूचित तंत्राचा वापर करून काही महत्त्वपूर्ण माहिती मिळवण्याचा प्रयत्न केला जाईल. तसेच काही

बाबतीत माहिती मिळवण्याची शक्यता कमी असेल तर त्या दृष्टीने निरीक्षण तंत्र वापर करून माहितीची संकलन येणार आहे. संबंधित कुटुंबकडून आवश्यक ती माहिती प्राप्त करण्यासाठी मुलाखत अनुसूचित तंत्र देखील वापरण्यात येणार आहे.

2) दुय्यम स्त्रोत

प्रस्तुत संशोधन अध्ययनाची उद्दिष्टे पूर्ण करण्यासाठी आवश्यक ती संपूर्ण माहिती प्राप्त करून घेण्यासाठी प्रकाशित व अप्रकाशित अशा दोन्हीही दुय्यम तंत्राचा उपयोग करण्यात येणार आहे. संशोधन विषयाशी संबंधित माहिती संकलन करण्यासाठी वेगवेगळ्या ग्रंथांचा व शोधनिबंधांचा अभ्यासकरुन या विषयाशी साम्य असलेल्या विषयाचे अध्ययन करणाऱ्या सर्व संस्थांशी संपर्क करून माहिती प्राप्त करण्याचा प्रयत्न असेल. प्रस्तुत विषयाशी साम्य दर्शवणारे वर्तमानातपत्रातील लेख, मासिके, साप्ताहिके, संदर्भग्रंथ व इंटरनेट सेवा याचा वापर करून वास्तविक माहिती मिळवण्याचा प्रयत्न करून व त्या आधारे मिळालेल्या माहितीचे विश्लेषण करून निष्कर्ष देण्यात येतील.

तथ्य विश्लेषण -

प्रस्तुत संशोधनाच्या अनुषंगाने संकलित प्राथमिक तथ्याचे संख्यात्म्क आणि गुणात्मक आधारावर वर्गीकरण करण्यात येणार आहे. वगीकृत तथ्यांचे सारणीकरण

करुन विश्लेषण करण्यात येईल. तसेच दुय्यम स्त्रोताच्या आधारे संकलित केलेल्या माहितीचे व्यवस्थित विश्लेषण व अर्थनिर्वचन करुन निष्कर्ष काढण्यात येतील.

प्रकरणांची रूपरेषा -

प्रस्तुत संशोधन विषयाचे पैलू लक्षात घेऊन अभ्यासाकरिता प्रकरण मांडणी पाच प्रकरणांमध्ये केलेली आहे ती पुढील प्रमाणे आहे.

प्रकरण पहिले - प्रस्तावना

1) हिंगोली जिल्हा ऐतिहासिक घटक, भौगोलिक स्थान, लोकसंख्या जीवनमान इत्यादी घटकांवर प्रकाश टाकण्यात येईल.

2) एकच अपत्य असलेले कुटुंब संकल्पना, आंतरराष्ट्रीय परिस्थिती, भारतीय एकच अपत्य असलेले कुटुंब, संयुक्त कुटुंब ते विभक्त कुटुंब, हिंगोली जिल्ह्यातील आधुनिक लहान कुटुंब तसेच एकच अपत्य असलेले कुटुंब इत्यादी घटकांवर प्रकाश टाकण्यात येईल.

प्रकरण दुसरे - संशोधन पद्धती, संशोधन साहित्याचा आढावा

प्रस्तुत प्रकरणात संशोधनासाठी उपयोगात आणलेल्या संशोधन पद्धतीचे, नमुना निवड पद्धतीचे व तथ्य संकलन तंत्राचे विवेचन करण्यात येईल. संशोधन

साहित्याचा आढाव्यासाठी संबंधित विषयावरील संशोधन व प्रकाशित संदर्भ ग्रंथ, शोध निबंध इत्यादीचा आढावा घेतला जाईल.

प्रकरण तिसरे - एकच अपत्य असलेल्या पालकांची सामाजिक स्थिती (प्राथमिक तथ्यावर आधारित)

प्रस्तुत प्रकरणात एकच अपत्य असलेले पालक व पाल्य या दोघांचे कुटुंबाचे पालक व पाल्याचे सामाजिक जीवन, त्यांचे नाते, पालकांचा समाजावर होणारा प्रभाव इत्यादी घटकांचा अभ्यास केला जाईल.

प्रकरण चौथे - शैक्षणिक व आर्थिक स्थिती

1) शैक्षणिक स्थिती

एकच अपत्य पालकांची व पाल्याची शैक्षणिक स्थिती, शैक्षणिक समस्या, शैक्षणिक समस्येवर उपाय व आपत्याला येणाऱ्या शैक्षणिक अडचणी इत्यादी घटकांचा अभ्यास केला जाईल.

2) आर्थिक स्थिती

एकच अपत्य असलेल्या पालकांची आर्थिक स्थिती, आर्थिक समस्या, इत्यादींचा अभ्यास केला जाईल.

प्रकरण पाचवे- तथ्यांचे विश्लेषण व विवेचन

प्रस्तुत प्रकरणात हिंगोली जिल्ह्यातील एकच अपत्य असलेल्या पालकांचे सर्वेक्षण करून मुलाखत अनुसूचीचा आधार घेऊन व मुलगा व मुलगी यांच्या स्थितीचा तुलनात्मक अभ्यास करण्यात येईल.

प्रकरण सहावे- निष्कर्ष व शिफारसी

प्रस्तुत प्रकरणामध्ये तथ्य संकलनद्वारे प्राप्त माहितीचेअध्ययन करून निष्कर्ष नोंदवण्यात येईल. गृहीतकांची पडताळणी करून एकच अपत्य असलेल्या पालकांच्या समस्या सोडवण्यासाठी उपाय सुचवले जातील.

संदर्भ सूची :

1) नेवार ,सुसान (2001). एकुलत्या एक मुलाचे पालकत्व CA डिव्हिजन डेल ब्रॉडवे बुक्स बँटम डबलेडा पब्लिशिंग ग्रुप इंक).

2) कोठारी, सी.(1985). संशोधन पद्धती (पद्धती आणि नवीन युग आंतरराष्ट्रीय तंत्र) प्रकाशक: चौथी आवृत्ती (1 सप्टेंबर 2019)

3) बसू ए.एम. & देसल एस. (2010). मध्यमवर्गीय स्वप्ने: भारत एक मूल कुटुंब. अमेरिकन असोसिएशन ॲनिवल मीटिंग डालटाज्.

4) रावत, एच (2007), समाजशास्त्र - मूलभूत संकल्पना नवी दिल्ली: रावत

5) amrutha, rinuabraham (2016). single child family and adolescent brhaviour pattern A sociological analysis

6) गायकवाड, एस. (2014), मुख्य सामाजिक संस्था व समस्या. अरुणा प्रकाशन, लातुर

7) पाटील वा. (2006), संशोधन पध्दती, प्रशांत पब्लीकेशन्स : चौथी आवृत्ती (2022)

8) आगलावे प्रदीप (2022): सामाजिक संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर.

वर्तमानपत्रे

दै. लोकसत्ता

दै. महाराष्ट्र टाईम्स

दै. सकाळ

दै. लोकमत

Websites

https://www.google.com/search

www.mah.gov.in

www.shodhsindhu.com

www.onechild.com

www.shodhganga.com

http://www.census2011.com/

https://www.google.com/url

www.census2011.co.in/census/district

संशोधक

पवार प्रियंका शिवाजीराव

मार्गदर्शक

प्रा. डॉ. भिसे रामचंद्र मुंजाजी

(एम.ए., एम.फिल., पीएच.डी., नेट)

समाजशास्त्र विभाग प्रमुख,

दिगंबरराव बिंदू कला व वाणिज्य महाविद्यालय,

भोकर जि. नांदेड.